मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

■ मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■ मुंबई ■ अंक : ७७ ■ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ शनिवार दि. ३० मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी विवेकानंद महोत्सव : प्राचार्य डॉ. कुंभार



कोल्हापूर : सध्याच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे. सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून अशा काळात विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. अशा काळात विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाला आकार देण्यासाठी, त्यांच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा २०२४ चे केलेले आयोजन महत्त्वपूर्ण आहे, असे मत महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविकात विवेकानंद महोत्सवाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी या महोत्सवाचा उद्देश कथन केला. विद्यार्थ्यांमध्ये समाजोपयोगी वाढावी अनेक सामाजिक क्षेत्रातील अनेक समस्यांच्या निराकरणासाठीची जाणीव निर्माण व्हावी. स्वतः चा व्यवसाय उभा करण्याची जिद्द व चिकाटी निर्माण करून त्यांचा विकास होण्यासाठी हा उपक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या फूड फेस्टिवलचे उद्घाटन प्राचार्य डॉ. कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. दोन दिवस संपन्न झालेल्या या महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, वक्तृत्वपूर्ण संशोधन, शॉर्ट फिल्म मेकिंग, एकपात्री या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. वाचकांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मिस्टर अँड मिस विवेकानंद ही स्पर्धा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी उत्साहात संपन्न झाली.

या स्पर्धेमध्ये मुंबई, पुणे, सांगली, सातारा, कोल्हापूर येथील विद्यार्थ्यांचे संघ सहभागी झाले होते. स्पर्धेचे समन्वयक म्हणून डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एच. पी. चाचे, प्रा. डॉ. ए. एस. महाजन, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. सनी काळे यांनी जबाबदारी पार पाडली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले तर आभार डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी मानले.

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ■मराठी दैनिक भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

# ग्लोबल टाइम्स

■ Register No. : RNI - MAHMAR /2012/44621 ■मुंबई ■अंक : ७७ ■वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ शनिवार दि. ३० मार्च २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹ ३.००

## मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जपली पाहिजे : आप्पासाहेब खोत



कोल्हापूर : यशस्वी होण्यासाठी मोठी स्वप्ने पाहिली पाहिजेत. तरुणाईमध्ये जग जिंकण्याची खूप मोठी शक्ती आहे. आपल्या मर्यादा लक्षात घेऊन एखादे क्षेत्र निवडल्यास यश नक्कीच मिळते. वाचनाने माणूस समृद्ध होतो. महामानवांची चरित्रे वाचून विद्यार्थ्यांनी चारित्र्यवान बनले पाहिजे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सामान्य माणसापासून लिहित्या हाताना बळ दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले.

ते विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. वाग्मणी गवाहर या कवीचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी, विवेकानंद कॉलेजच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी सांगितलेल्या पंचसूत्रीचा अवलंब करून महाविद्यालयाचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. गुणी विद्यार्थी गौरव समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते व इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत राहते, असे मत मांडले.

यावेळी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविलेल्या कला, क्रीडा, सांस्कृतिक, एनसीसी व एनएसएस विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र, गौरवचिन्ह व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.

स्वागत व प्रास्ताविक विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार यांनी केले. यावेळी विवेकानंद कॉलेजचे परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. न्यावे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुडाळे यांनी विद्यार्थ्यांच्या पारितोषिकांचे वाचन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील व प्रा.समीक्षा फराकटे यांनी केले तर आभार प्रा. सरिता कपाडी यांनी मानले. कार्यक्रमास आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, गणित विभागप्रमुख प्रा. संजय थोरात, जिमखाना विभागप्रमुख प्रा. एस. आर. सरगर, सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. आरिफ महात, कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. समीर पठाण, रजिस्ट्रार आर. बी. जोग तसेच प्राध्यापक, प्रशासकीय सेवकवर्ग व विद्यार्थी उपस्थित होते.

30/03/24

30/3/24

तरुण भारत संवाद
शनिवार, ३० मार्च २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलिजमध्ये बोलताना आप्पासाहेब खोत. सोबत संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार.

# मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जपली पाहिजे

## कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

वाचनाने माणूस समृध्द होतो. महामानवांची चरित्रे वाचून विद्यार्थ्यांनी चारित्र्यवान बनले पाहिजे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सामान्य माणसापासून लिहित्या हातांना बळ दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन कथाकथनकार आप्पासाहेब खोत यांनी केले.

विवेकानंद कॉलेजच्या गुणी विद्यार्थी गौरव समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. विवेकानंद कॉलेजचे परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. एम. ए. कुरणे, प्रा. एस. एस. कुंडले यांनी विविध पारितोषिकांचे वाचन केले. प्रा. सुप्रिया पाटील व प्रा. समीक्षा फराकटे यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव आर. बी. जोग, डॉ. श्रुती जोशी, प्रा. संजय थोरात, प्रा. एन. आर. सणगर, डॉ. आरिफ महात, कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा, प्रा. समीर पठाण उपस्थित होते.

30/03/24

30.3.24

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ३० मार्च २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार. समवेत डॉ. श्रुती जोशी, डॉ. प्रदीप पाटील आदी. (छाया : पप्पू अत्तार)

# विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे : प्राचार्य डॉ. कुंभार

**कोल्हापूर :** सध्याचा काळ कौशल्य विकासाचा असून, अशा काळात विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी स्पर्धेमध्ये सहभागी होणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. फूड फेस्टिव्हलचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी अभिवाचन, नावीन्यपूर्ण संशोधन, शॉर्ट फिल्म मेकिंग, एकपात्री स्पर्धा झाल्या. मिस्टर अँड मिस विवेकानंद ही स्पर्धा महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी झाली. स्पर्धेत मुंबई, पुणे, सांगली, सातारा येथील संघ सहभागी झाले. समन्वयक डॉ. श्रुती जोशी यांनी महोत्सवाचा उद्देश प्रास्ताविकात सांगितला. समन्वयक म्हणून डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एच. व्ही. चामे, प्रा. डॉ. ए. एस. महात, प्रा. पल्लवी देसाई, प्रा. सनी काळे यांनी जबाबदारी पार पाडली. प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. आर. कट्टीमनी यांनी आभार मानले.

30/03/24

30.3.24